# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०५/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

### जलालखेडा पोलीसांची अवैध्य वाळु माफिया विरूध्द धडाकेबाज कार्यवाही

काल दिनांक २७/०५/२०२४ रोजी रात्री २१/०० वा. दरम्यान पो.स्टे. हद्दीत अवैध्य वाळु वाहतुकीवर आळा घालण्या करीता मा. सी.बी. चौहान ठाणेदार जलालखेडा यांचे पथक PSI/ शेंडे, PSI/ रामटेके, पोलीस अंमलदार पुरूषोत्तम काकडे, निलेश खरडे, फिरोज शेख, जाकीर शेख, आशिष हिरूळकर, दिनेश जोगेकर, शिवदास सौंदळे, किशोर कांडेलकर, व चालक रविंद्र मोहोड सह पेट्रोलिंग करीत असतांना विश्वसनिय गोपनिय मुखबिराद्वारे माहीती मिळाली कि, ग्राम– भिष्णूर परिसरामध्ये जाम नदी पात्रामधून १) किशोर व्यंकटराव चरडे वय ५७ वर्ष रा. भिष्णूर २) कैलास शेषराव कळंबे वय ३४ वर्ष रा. भिष्णूर हे व्यक्ति अवैध्यत्या वाळु वाहतुक करित आहे. अशा माहीती वरून स्टाफसह जाम नदीपात्रात लपत छपत जावून पाळत ठेवली असता, जाम नदी पात्रातून भिष्णूर रोडवर ०२ ट्रॅक्टर येतांना दिसले स्टाफच्या मदतीने सदरचे ट्रॅक्टर थांबवून ट्रॅक्टरमध्ये पाहणी केली असता रेती आढळून आली रॉयल्टी बाबत विचारणा केली असता रॉयल्टी नसल्याचे सांगीतले वरूण सदरचे दोन्ही ट्रॅक्टर क्रमांक १) MH 40 A-1646 व ट्रॉली MH 40 A/2711 मध्ये अंदाजे ०१ ब्रास वाळू/रेती किंमत ५०००/– रू. व स्वराज कंपणीचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह किंमत ५,००,०००/– रू. २) MH 40 TCD-01 व ट्रॉली MH 40 CQ-6579 मध्ये अंदाजे अर्धा ब्रास वाळू/रेती किंमत २,५००/–रू. व जॉन्डीयर कंपणीचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह किंमती ६,००,०००/– रू. असा एकुण ११,०७,५००/– रू. चा. माल आरोपीचे ताब्यातून जप्त करूण ठाणेदार सा. यांचे आदेशाने पो. स्टेला. गु.र.नं. २५१/२०२४ कलम ३७९ भादंवी सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधि. सहकलम ४, २१ खाण आणि खणिज अधि. सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद करून गुन्ह्यातील आरोपी पोस्टेला अटक करण्यात आले आहे.

तसेच पेट्रोलिंग करीत असतांना विश्वसनिय गोपनिय मुखबिराद्वारे माहीती मिळाली कि, अवलीया बाबा दर्गाह, मसली फाटा भिष्णूर जवळ एक आकाशी रंगाचे वाळु/रेतीने भरलेला ट्रक येत आहे अशा माहीती वरून सदर ठीकाणी स्टाफसह गेले व स्टाफच्या मदतीने सदरचा ट्रक थांबवीला असता, सदर ट्रकचा क्रमांक MH 40 BG-5524 सदर ट्रक मध्ये पाहणी केली असता वाळु मिळून आली चालक नामे– किशोर सिताराम कुंभरे वय ३५ वर्ष रा. डोंगरगाव यास रॉयल्टी बाबत विचारणा केली असता रॉयल्टी नसल्याचे सांगीतले सदर ट्रक मध्ये अंदाजे ०५ ब्रास वाळु/रेती किंमत २५,०००/– रू. व टाटा कंपणीचा टिप्पर ट्रक किंमत २०,००,०००/– रू. असा एकुण २०,२५,०००/– रू. चा. माल आरोपीचे ताब्यातून जप्त करूण ट्रक मालक मंगेश मारोतराव देव्हारे वय ३८ वर्ष रा. झिल्पा ता. काटोल यांचे मालकीचा असून, सदर ट्रकचा चालक नामे किशोर सिताराम कुंभरे वय ३५ वर्ष रा. डोंगरगाव व मालक मंगेश मारोतराव देव्हारे वय ३८ वर्ष रा. झिल्पा ता. काटोल यांचे विरूद्ध ठाणेदार सा. यांचे आदेशाने पो.स्टेला. गु.र.नं. २५२/२४ कलम ३७९, १०९ भादंवी सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधि. सहकलम ४, २१ खाण आणि खणिज अधि. सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद गुन्हा नोंद करून गुन्ह्यातील आरोपी पोस्टेला अटक करण्यात आले आहे. सदरचे दोन्ही गुन्ह्यांमध्ये असा एकुण ३१,३२,५००/– रू. चा माल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. बापू रोहोम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांचे मार्गदर्शनाखाली जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि सी.बी. चौहान, PSI/ शेंडे, PSI/ रामटेके, पोलीस अंमलदार पुरूषोत्तम काकडे, निलेश खरडे, फिरोज शेख, जाकीर शेख, आशिष हिरूळकर, दिनेश जोगेकर, शिवदास सौंदळे, किशोर कांडेलकर, व चालक रविंद्र मोहोड यांचे मदतीने करण्यात आलेली आहे.

गुन्हयांचा तपास ठाणेदार सपोनि सी. बी. चौहान यांचे मार्गदशर्नात पोहवा पुरूषोत्तम काकडे व पोना दिनेश जोगेकर हे करित आहे.



---

## <u>ॲल्युमिनीअम वायर चोरी करणारा आरोपी अटकेत</u>

पोस्टे कन्हान अंतर्गत दिनांक ०२/०५/२०२४ रोजी चे १०.०० वा. दरम्यान कामठी उपप्रादेशिक कार्यालय खदान क्र. ०३ येथील विज विभागाने ठेवलेले प्रत्येकी ७५ किलो वजनाच्या ॲल्युमिनीअम वायरचे दोन बंडल किंमती ४०००/—रू. चे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे फिर्यादीचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे ३६३/२४ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचे तपासात आरोपीचे शोधकामी दिनांक २७/०५/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहिती वरून **आरोपी नामे सुरेंद्र तिलकचंद लिल्हारे वय ३२ वर्ष रा. वार्ड क्रं. १ हरिहर नगर कन्हान** यास कांद्री कन्हान येथुन ताब्यात घेतले. आरोपीस सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता आरोपीने चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन चोरी गेलेले ॲल्युमिनीअम वायरचे दोन बंडल किंमती ४०००/—रू. व गुन्हयात वापरलेली मारूती ओमनी क्र. एम एच—३१/सी.एम—६९९८ किंमती ३०,०००/—रू. मोपेड गाडी ॲक्टीव्हा क्र. एम. एच—४०/सी.यु—२२५५ किंमती ५०,०००/—रू. हिरो होंडा कंपनीची मोसा क्र. एम एच—३१/इ डी— ५९५६ किंमती २५,०००/—रू. असा एकुण १०९०००/— रू. चा मुद्देमाल आरोपीचे घरासमोरील खुल्या जागेतून जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सपोनि पराग फुलझेले, पोहवा उमाशंकर पटेल, पोहवा नरेश श्रावणकर, नापोशि आशिक कुमरे, प्रशांत रंगारी, चालक पोहवा बंटी गेडाम यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर